दैनिक लोकप्रधान
Email:-dailylokpradhan@gmail.com
10/10/2024 Page: 04

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सायबर वॉरियर्सनी केली सायबर सुरक्षिततेची जनजागृती





**लोकप्रधान न्युज नेटवर्क**

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा जनजागृतीचा अनोखा उपक्रम राबविला जात आहे.

विद्यापीठाच्या संगणक शास्त्र संकुलातील सायबर वॉरियर्स कांचन निकंबे व सई आवताडे या विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळ्यानंतर जाणाऱ्या महिलांना सायबर सुरक्षिततेची महिती दिली.

लोकांच्या जागरूकतेच्या अभावामुळे सायबर गुन्ह्यांची दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचा वचनपूर्ती सोहळा संपन्न झाल्यानंतर जाणाऱ्या महिलांना निकंबे व अवताडे या दोघींनी सायबर सुरक्षा या विषयावर माहिती दिली.

बँकेतून कर्मचारी बोलतोय म्हणून बँकेची महिती देणे, कोणताहि ओ. टी. पी शेअर करू नये, कोणत्याही अनोळखी लिंक वर क्लिक करू नये अशी माहिती सई यांनी दिली. पब्लिक वायफाय चा वापर टाळावा, आपले पासवर्ड मजबूत ठेवावे, सोशल मीडियावरती आपली खासगी माहिती शेअर करू नये.

तसेच आपल्या अकाउंटला टू फॅक्टर अथंडीकेशन लागू करावे असा संदेश कांचन यांनी दिला. विविध मोबाईल मधल्या आवश्यक सेटिंग्ज त्यांनी महिलांना समजावून सांगीतल्याकोणता सायबर गुन्हा आपल्या सोबत घडल्यास १९३० या हेल्पलाईन नंबर वर कॉल करून किंवा cybercrime.gov.in या वेबसाईट वरून आपली तक्रार नोंद करावी अशी माहिती सई यांनी दिली.

अश्या तऱ्हेने कार्यक्रमातून जाणाऱ्या महिलांना थांबवून यादोघी विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती केली.